


साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2567, माघ पौर्णिमा, 24 फेब्रुवारी, 2024 वर्ष 7 अंक 12

वार्षिक शुल्क रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहा: http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**असेवना च बालानं, पण्डितानञ्च सेवना।**
**पूजा च पूजनीयानं, एतं मङ्गलमुत्तमं ॥2॥**

*– सुत्तनिपातपालि गाथा 262, मङ्गलसुत्तं*

मूर्खांची संगत न करणे, पंडितां (ज्ञानीजनां) ची संगत करणे आणि पूजनीयांची पूजा करणे– हे उत्तम मंगल आहे.

# असे होते गुरुदेव : सयाजी ऊ बा खिन

## कमळाहून कोमल: वज्रासमान कठोर

मैत्री आणि करुणेने ओतप्रोत भरलेल्या संतपुरुषाचे हृदय कमळाच्या पाकळ्यांसमान कोमल असते. परंतु कर्तव्यपरायणतेच्या क्षेत्रात जिथे आवश्यक असेल, तिथे वज्रासमान कठोर बनते. सयाजींच्या जीवनात हे दोन्ही गुण वारंवार प्रकट होत असत. असे अनेक प्रसंग आहेत, ज्यातील दोन-चार प्रसंगांचा उल्लेख करणे पर्याप्त होईल.

४ जानेवारी, १९४२ ला ब्रह्मदेश स्वतंत्र झाला. परंतु स्वतंत्र सरकारला सुरुवातीपासूनच अनेक बहुरंगी बंडखोरांशी सामना करावा लागला. भिन्न-भिन्न मत-मतांतरांच्या बंडखोरांचे समूहच्या समूह देशाच्या भिन्न-भिन्न भागांमध्ये सरकारच्या विरोधात उभे ठाकले. त्यांच्याजवळ हत्यारांची कमतरता नव्हती. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपान्यांनी आणि त्यांच्यासारख्याच मित्रराष्ट्रांनीही युद्धात बर्मी युवकांना आपल्याकडे खेचण्यासाठी मुक्त-हस्ताने हत्यारे वाटली. आता देशात सुव्यवस्थित शासन लागू करण्यात हेच बाधक ठरले. बंडखोरांनी इतके मोर्चे काढले की नवनिर्मित सरकारी सैन्याला त्यांचा सामना करणे कठीण होऊन गेले. हळू-हळू सर्वत्र बंडखोरांचा दबदबा पसरून गेला. सर्व ठिकाणी त्यांचेच वर्चस्व. समाजवाद, साम्यवाद, जातीवाद, क्षेत्रवादाच्या घोषणा देणाऱ्या भिन्न-भिन्न बंडखोरांनी भिन्न-भिन्न स्थानांना आप-आपल्या कब्जात घेऊन ठेवले होते. एक वेळ अशी आली की म्यंमाचे केंद्र-सरकार केवळ रंगून नगरापुरतेच मर्यादित राहिले. बंडखोरांचा एक दल रंगूनचेही दरवाजे खटखटवू लागला. शहरापासून १०-१२ मैल दूर अंतरापर्यंत त्यांचे आधिपत्य स्थापित झाले. केंद्र-सरकारचे अस्तित्वच धोक्यात आले. साऱ्या देशात अराजकता पसरली होती. रंगूनचे सरकार पडले तर देशाची केंद्रीय सत्ताही उध्वस्त झाली असती. सारा देश तुकड्यांमध्ये विभागला गेला असता. सरकार चिंतेत, सैन्य चिंतेत, पण करायचे काय? देश वाचण्याची काहीच आशा दिसत नव्हती.

पूज्य गुरुदेवांना देशात सुख-शांती आणि समृद्धी हवी होती. पण ते तरी काय करतील? त्यांचे बळ तर धर्म-बळच होते. कधी प्रधानमंत्र्यांच्या घरी जाऊन मंगल मैत्री देत असत. कधी आपल्या निवासस्थानाहूनच देशाच्या सुरक्षेची मंगल कामना करीत असत.

एकीकडे त्यांच्या हृदयात कमळासमान कोमलता आणि दुसरीकडे एका घटनेमुळे त्यांचे हृदय वज्रासमान कठोर झाले. झाले असे की या आपत्काळी सरकारने आपल्या शेजारी देशाकडे मदत मागितली. शेजारील देश मित्र होता. संकटात साथ द्यायला तयार झाला. पण जी सामग्री त्याने देण्याचे स्वीकारले, ती विमानाद्वारेच आणली जाऊ शकत होती. सरकारकडे उपयुक्त विमान-सेवेचे साधन नव्हते. तेही बाहेरून उपलब्ध करायचे होते. या योजनेला सफल करण्यासाठी सरकारने जो निर्णय घाईघाईने घेतला, तो देशाच्या कायद्याच्या चौकटीत बसत नव्हता.

सयाजी ऊ बा खिन महालेखाकार होते. त्यांनी या निर्णयाला अवैध ठरवले. सरकार गोंधळात पडले. प्रधानमंत्री जाणत होते की सयाजी सिद्धांतांचे धनी आहेत. या मामल्यात तडजोड करणारे नाहीत. ते नेहमी दृढतापूर्वक हेच म्हणत होते की मला वेतन याच गोष्टीचे मिळते की मी राज्य-कोषाचा एक पैसाही नियमाविरुद्ध खर्च होऊ देणार नाही.

प्रधानमंत्र्यांच्या मनात सयाजींच्या या कर्तव्यनिष्ठेप्रति खूप सन्मान होता, परंतु स्थिती खूप नाजूक होती. तेव्हा सयाजींना सल्ला-मसलत करण्यासाठी बोलविले गेले आणि त्यांना निवेदन केले गेले की आवश्यक सामग्री तर आणावीच लागेल. यासाठी खर्च केला जाणे आवश्यक आहे. आता आपणच सांगावे की याला कसे नियमांच्या चौकटीत बसविता येईल? सयाजींनी मार्ग सांगितला आणि त्याला अंमलात आणून सरकार चांगल्या उद्देशाला चुकीच्या पद्धतीने पूर्ण करण्याच्या दोषापासून वाचले.

### असाच एक अन्य प्रसंग:

हळू-हळू राष्ट्रीय सेनेने बंडखोरांचा खात्मा केला. केवळ दूर अंतरावर असलेल्या पहाडी प्रदेशांना सोडून जवळजवळ संपूर्ण देशातील बंडखोर चिरडून टाकण्यात आले. आता सरकार समाज-कल्याणाच्या विविध योजनांमध्ये अधिक लक्ष देऊ लागली. भिक्षु-संघाच्या कृपेने देशात साक्षरतेची समस्या नव्हती. थोडेसे गिरिजन सोडले तर बाकी सारा देश साक्षर होता. पण उच्च शिक्षणाचा अभाव होता. याला पूर्ण करण्याच्या शुभ उद्देशाने प्रधानमंत्र्यांनी एका विशाल सार्वजनिक सभेमध्ये गावो-गावी प्रौढ-शिक्षण सुरु करण्याची घोषणा केली आणि त्याच बरोबर या कार्यासाठी संबंधित मंत्रालयाला तत्काळ एक मोठी रक्कम देण्याचा प्रस्ताव दिला.

या योजनेच्या प्रति सयाजींना पूर्ण सहानुभूती होती. परंतु इतकी मोठी रक्कम अंदाजपत्रकाच्या कोणत्याच कक्षेत बसत नव्हती. त्यामुळे त्यांनी विरोध

केला. प्रधानमंत्र्यांची अवस्था खूप बिकट झाली, परंतु ऊ बा खिन यांचा विरोध नियमानुकूल होता त्यामुळे त्यांनी तो स्वीकारला. परंतु जी घोषणा करण्यात आली होती, तिला पूर्ण करायचेच होते. तेव्हा प्रधानमंत्र्यांनी एक आणखी पर्याय शोधला. रंगून रेस-कोर्स क्लबच्या प्रमुख अधिकाऱ्यांना बोलविले आणि या योजनेला सफल करण्यासाठी त्यांचा सहयोग मागितला. एक दिवस विशेष घोडदौडीचे आयोजन करण्यात यावे, ज्याचे प्रवेश-मूल्य जास्त ठेवले जावे. त्यातून जी मोठी प्राप्ती होईल ती या शुभकार्यासाठी दानात देण्यात यावी. प्रधानमंत्र्यांची गोष्ट कोण टाळेल भले! आणि असेच झाले. रेस-क्लबला त्या दिवशी खूप जास्त उत्पन्न मिळाले. एका विशाल सार्वजनिक सभेत त्या रकमेचा चेक रेस-क्लबवाल्यांनी प्रधानमंत्र्यांना आणि प्रधानमंत्र्यांनी संबंधित मंत्र्याकडे मोठ्या धूमधडाक्यात सुपूर्द केला.

आयोजनानंतर जेव्हा प्रकरण सयाजींकडे आले तेव्हा त्यांनी पुन्हा अडविले. प्रधानमंत्री हैराण झाले. त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. ऊ बा खिन आता का चेक वटवायला रोखत आहेत? हा तर सरकारी पैसा नाही. याला अडविण्याचा त्यांना काय अधिकार आहे? परंतु ऊ बा खिन यांनी नोट लिहून पाठवली की रेस-कोर्सच्या उत्पन्नातून सरकारी कराची रक्कम कापून जी शिल्लक राहील, तिचे भुगतान केले जाऊ शकते. प्रधानमंत्री निरुत्तर झाले. त्यांनी हसून त्यांचे म्हणणे स्वीकारले आणि त्याप्रमाणेच झाले.

प्रधानमंत्र्यांची गोष्टच काय? कोणत्याही कैबिनेट मंत्र्यांच्या निर्णयाविरुद्ध निर्भयतापूर्वक आवाज उठवणे हे ऊ बा खिन सारख्या विरळ्या अधिकाऱ्याच्याच आवाक्यातली गोष्ट होती.

ऊ बा खिन शासन-सेवेची जबाबदारी निभावण्यात जितके निर्भीड होते, तितकेच निष्पक्ष देखील. या प्रसंगांच्याही अनेक घटना आहेत.

त्यांच्या कार्यालयात एक कनिष्ठ अधिकारी होता जो त्यांचा प्रिय शिष्यही होता. तो खूप विनम्र आणि सेवाभावी व्यक्ती होता. गुरुजींच्या सेवेमध्ये नेहमी तत्पर राहणारा. गुरुजींनाही त्याच्या प्रति खूप वात्सल्यभाव होता. परंतु हा वात्सल्यभाव कर्तव्यपरायणतेमध्ये बंधन बनू शकला नाही. झाले असे की वर्षाच्या शेवटी अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीची वेळ आली. पदोन्नतीच्या यादीत या व्यक्तीचे नाव सर्वात वर होते, कारण सेवा-कालावधीच्या गणनेमध्ये तो इतरांपेक्षा वरिष्ठ होता आणि यामुळे पदोन्नतीचा खरा हक्कदार होता. गुरुदेवांना त्याच्या पदोन्नतीची शिफारस करणे सहज शक्य होते पण त्यांनी असे केले नाही. पदोन्नतीसाठी केवळ वरिष्ठताच पाहिली जाऊ नये योग्यता आणि कार्यदक्षताही पाहिली जावी, ज्याची त्याच्यात कमतरता होती. गुरुजींनी त्याला बोलवून प्रेमाने समजावले की त्याने अमुक एक लेखा-परीक्षा दिली आणि पास केली तर पदोन्नती मिळू शकेल. शिष्याने गुरुची गोष्ट स्वीकारली. तिला पूर्ण करण्यात त्याला दोन वर्षे लागली. तेव्हाच त्याला पदोन्नती मिळाली.

**निर्भयतेप्रमाणेच निष्पक्षताही त्यांचा विशेष गुण होता.**

विरळेच असतात असे निर्भीड आणि निष्पक्ष, निस्पृह आणि निरासक्त वात्सल्याचे धनी. कमलदलाहून कोमल परंतु वज्राहून कठोर. माझे सौभाग्य की अशा अनासक्त गुरुदेवांच्या चरणांमध्ये बसून मला धर्म शिकण्याचा अवसर मिळाला. त्यांच्या गुणांचे स्मरण करत त्यांना शत-शत प्रणाम!

## शुद्ध धर्माची शिकवण

गुरुदेवांच्या ज्या एका गोष्टीने मला त्यांच्याकडे सर्वाधिक आकर्षित केले ती होती त्यांची शुद्ध धर्माची सार्वजनिक व्याख्या. खरोखर बुद्धांनी शुद्ध धर्मच शिकवला. सांप्रदायिकतेच्या संकुचित सीमेपलीकडचा. आणि हाच गुरुदेवांचाही शिक्षण-विधी होता. याला भिन्न-भिन्न संप्रदायाचे आणि समाजाचे लोक सहजतेने धारण करू शकतात आणि लाभान्वित होऊ शकतात. मी गुरुदेवांमध्ये असा कोणताही सांप्रदायिक भावावेश पहिला नाही की ज्याच्यामुळे कोणी व्यक्ती इतर संप्रदायवाल्यांना आपल्या संप्रदायामध्ये दीक्षित करण्यासाठी आतुर झाला असेल. ते कोणत्याही प्रकारच्या औपचारिक सांप्रदायिक दीक्षेला महत्व देत नव्हते.

हे खरे आहे की ते परंपरागत बौद्ध होते आणि असे असण्याचा त्यांना गर्व होता. परंतु त्यांच्यासाठी बुद्धांच्या शिकवणीचा सार शुद्ध सार्वजनिक धर्म होता, सांप्रदायिकता नाही. त्यांच्या दृष्टीने बुद्धांचा खरा अनुयायी तोच आहे जो सद्धर्म धारण करतो. त्यांचे लक्ष्य होते लोकांना बुद्ध-शासनात स्थापित करणे म्हणजेच धर्मात स्थापित करणे. यासाठी ते वारंवार समजावत होते की बुद्ध-शासन काय आहे :

**सब्बपापस्स अकरणं, कुसलस्स उपसम्पदा।**
**सचित्तपरियोदपनं, एतं बुद्धान सासनं॥**

सर्व अकुशल पापकर्मांपासून दूर राहणे. कुशल कर्मांमध्ये रत राहणे. आपल्या चित्ताला घासत राहणे, निर्मळ करत राहणे– हेच बुद्धांचे शासन आहे म्हणजेच शिकवण आहे. सर्व बुद्धांची हीच शिकवण आहे.

शील, समाधी आणि प्रज्ञा. ते लोकांना यातच प्रतिष्ठापित होण्यासाठी मदत करत होते जेणेकरून लोक मलिनतेतून निर्मलतेच्या, दुःखातून दुःख-विमुक्तीच्या सुखमय जीवनात परिवर्तित व्हावेत, दीक्षित व्हावेत. अशा रीतीने निर्मलतेत दीक्षित होऊन कोणी आपल्या स्वत:ला बौद्ध म्हणत असेल तर सयाजी अतिशय प्रसन्न होत असत. परंतु केवळ नाव बदलल्याने एखाद्याला काय मिळेल भले? स्वभाव सुधारला तर जीवन सुधारेल. बस्स महत्व याच गोष्टीला देत होते.

लोकांना संप्रदायात दीक्षित करण्याच्या भावावेशात लागलेल्या अनेकांना गुरुदेव खूप खडे बोल सुनावत होते. म्हणायचे, "इतरांना बुद्धशासनात स्थापित करण्याचा प्रयत्न करण्याआधी स्वत: बुद्धशासनात स्थापित होणे शिका. स्वत: शील, समाधी, प्रज्ञेमध्ये स्थापित झाल्याशिवाय कुणा दुसऱ्याला शील, समाधी, प्रज्ञेमध्ये कसे स्थापित करु शकाल? आणि शील, समाधी, प्रज्ञेमध्ये स्थापित करू शकला नाहीत तर बुद्धशासनात कसे स्थापित करू शकाल? केवळ एखादी निष्प्राण पोकळ औपचारिकता पूर्ण करून त्यांचा संप्रदाय बदलण्याने काय मिळेल?" ते मोठ्या कडक शब्दात म्हणत असत, "जर तुम्ही शील, समाधी, प्रज्ञेत प्रतिष्ठापित नसाल तर आपल्या स्वत:ला हजार बौद्ध म्हणत रहा, माझ्यासाठी तुम्ही बौद्ध नाहीत आणि जो शील, समाधी, प्रज्ञेत प्रतिष्ठापित आहे तो आपल्या स्वत:ला बौद्ध म्हणो अथवा न म्हणो, माझ्यासाठी तो बौद्धच आहे. बुद्धांच्या शिकवणीचा खरा अनुयायी आहे. हीच खरी तातना प्यू आहे म्हणजे एखाद्याला शासनात स्थापित करणे आहे."

**गुरुदेवांच्या सांप्रदायिकताविहीन प्रशिक्षणाचे एक उदाहरण:**

एक कट्टर ख्रिश्चन व्यक्ती विपश्यना शिकायला आला. प्रारंभिक औपचारिकतांचा सार समजावित जेव्हा गुरुजींनी तीन रत्नांची शरण घेण्यासाठी सांगितले तेव्हा तो व्यक्ती खूप घाबरला. त्याला वाटले की अशा प्रकारे त्याला ख्रिश्चन संप्रदायामधून बौद्ध संप्रदायात दीक्षित केले जात आहे आणि या निरर्थक भयाने भयभीत होऊन त्याने बुद्धांची शरण ग्रहण करणे नाकारले. म्हणू लागला, "शरण घ्यायचीच आहे तर ईसा मसीहांची घेईन, बुद्धांची नाही."

"बरं! ठीक आहे" गुरुजींनी हसून म्हटले "ईसा मसीहांचीच शरण ग्रहण करा परंतु या समजदारीने करा की तुम्ही वस्तुत: ईसा मसीहांच्या गुणांची शरण ग्रहण करीत आहात की ज्यामुळे ते गुण तुमच्यातही जागतील. पण काम मी जसे सांगेन तसेच करीत रहा." त्याने तसेच काम केले– शील, समाधी, प्रज्ञेचे. आणि शिबिर समाप्त होता-होता त्याला स्वत:च्या प्रारंभिक विरोधासाठी खूप पश्चाताप झाला. त्याने जाणले की संप्रदायात दीक्षित होण्याचे त्याचे भय नितांत भ्रामक होते.

**कल्याणमित्र,**
**सत्यनारायण गोयंका**

*(– वर्ष 21, बुद्धवर्ष 2535, मार्गशीर्ष पौर्णिमा, दि. 21-12-1991, अंक 6 मधून साभार)*

रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/RNP 286/2024-2026


# मंगल मृत्यू

1. तैवानच्या आदरणीय भिक्खुणी मिंग चिया सीह यांनी 21 जानेवारी, 2024 ला शांतीपूर्वक शरीर सोडले. त्यांनी सन 2000 पासून 2011 पर्यंत तैवानच्या क्षेत्रीय आचार्यांच्या रूपात सेवा दिली आणि नंतर तिथे दीर्घ शिबिरासाठी बनलेल्या ‘धम्म विकास’ विपश्यना केंद्र स्थापित करण्यातही पूर्ण योगदान दिले. त्यांनी अनेक शिबिरांचे संचालन करून असीम पुण्यपारमी अर्जित केली. त्यांची धर्मपथावर उत्तरोत्तर प्रगती होत त्या निर्वाणलाभी होवोत, धर्मपरिवाराची हीच मंगल कामना आहे.

oooooooooooooooooooooo

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. श्री शंकर राज शाक्य, धम्म जननी, नेपाळच्या विपश्यना केंद्राच्या केंद्र-आचार्यांची सहायता
2. श्री केहर सिंह खड्का, धम्म जननी, नेपाळच्या विपश्यना केंद्राच्या केंद्र-आचार्यांची सहायता

### नवीन उत्तरदायित्व
### आचार्य

1. श्रीमती एस. जानकी, चेन्नई (पूर्व जबाबदाऱ्यांसहित)
2. श्री रामनाथ शेनॉय, मुंबई
3. श्री आर. श्रीनिवासन, मदुराई, तामिलनाडु

### नवीन उत्तरदायित्व
### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्री संतोष जांभुळकर, नागपुर
2. श्री भानुमुरथी तम्मली, हैदराबाद
3. श्री मार्कण्डेयुलु वेलमुरी, हैदराबाद
4. श्री लक्समैया बंडारी, सिंकन्दराबाद
5. श्रीमती वीणा बंडारी, सिंकन्दराबाद
6. श्री सिद्दम्म पोथुरु, सिंकन्दराबाद
7. श्री वल्लभनेनी ब्रह्मा वरा प्रसाद, एलुरू
8. श्री हृदय नारायण चौधरी, नेपाल
9. श्रीमती रेनू जाजोदिया, नेपाल
10. श्रीमती पुष्पा लाम्सल, नेपाल
11. श्रीमती सानु मैया के. सी. नेपाल
12. श्री प्रकाश बीर सिंह तुलाधर, नेपाल
13. श्री ज्ञान दर्शन ऊदास, नेपाल
14. श्री बिष्णु प्रसाद भंडारी, नेपाल
15. श्री बसंत कुमार थापा, नेपाल

### नव नियुक्ती
### सहायक आचार्य

1. कु. सुरभी जैन, जयपुर
2. श्री खुशलसिंह परदेशी, औरंगाबाद
3. श्री शंकर प्रतापसिंह ठक्कर, मांडवी, कच्छ
4. श्रीमती नंदादेवी बोरसे, धुळे
5. श्रीमती मीना बोरसे, धुळे
6. कु. नलिनी गुप्ता, बैंगलोर
7. श्री जीवन पुथमाने श्रीनिवास, बैंगलोर
8. श्री अमरनाथ, बी. एल., बैंगलोर
9. श्री संतोष धर्मराज, बैंगलोर
10. श्रीमती विमला ओक, बैंगलोर
11. श्री प्रकाश पाटस्कर, हैदराबाद, तेलंगाना
12. श्रीमती नागमणि शनिगरपु, तेलंगाना
13. श्री विद्यासागर अब्बुरी, हैदराबाद, तेलंगाना
14. श्री बीरेंद्र राज वागले, नेपाल
15. श्री काशी राम घिमिरे, नेपाल
16. कु. शोवा थकाली, नेपाल
17. Mr. Phu Tshering Bhutia, Sikkim
18. Miss. Arawee Tovijit, Thailand
19. Mrs. Duangsamorn Jansomboon, Thailand
20. Mrs. Hui Zhen Xie, China
21. Mrs. Yi Liu, Taiwan, China
22. Ms Cheng-Hoon Low, Malaysia.

### बालशिबिर शिक्षक

1. श्रीमती सोनाली कोसे, चंद्रपुर
2. श्री अमन नंदेश्वर, नागपुर
3. श्री चंद्रमणि बनसोड, नागपुर
4. श्री जगदीश गजभिये, नागपुर
5. श्रीमती कविता चौहान, नागपुर
6. श्री परितोष डांगे, नागपुर
7. कु. सुजाता तमगाडगे, वर्धा
8. श्री आदित्य दगुड, कोलकाता
9. कु. गीता कुमारी, हुगळी
10. कु. श्यामश्री लाहिरी, कोलकाता
11. श्री विनोद रूके, पालघर
12. श्रीमती नेहा हरेशवाला, मुंबई
13. कु रीता पाटील, मुंबई
14. श्री अमरीश कदम, मुंबई
15. Mr. Mario Jayamaha, Sri Lanka,

## कल्याणमित्र पूज्य श्री सत्यनारायण गोयंकाजींच्या जन्म-शताब्दी समारोहाचे सफल समापन

4 फेब्रुवारी, 2024,रविवार या दिवशी या ऐतिहासिक समारोहाचे सफल समापन पाहून संपूर्ण विश्वभरातील साधकांचे तसेच अन्य अनेक प्रशंसकांचे मन प्रसन्नतेने भरून गेले. या पावन प्रसंगी ना केवळ देश-विदेशातील जवळपास 7000 जुन्या साधक-साधिकांनी ग्लोबल विपश्यना पगोडामध्ये एकत्र बसून सामूहिक साधना केली, तर अनेक केंद्रांवर, अनेक ठिकाणांवरही थेट प्रसारण पाहत-ऐकत जुन्या साधक–साधिकांनी सामूहिक साधना केली. या दरम्यान भारताचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदीजी यांचा एक विडियो संदेशही आला ज्याची अनेक भाषांमध्ये पाहण्याची लिंक खालील प्रमाणे दिली आहे —

*https://www.youtube.com/live/XeTF9f9l8zw?si=f168DpzPBlKRCWBD*

या प्रसंगी साधनेसंबंधी जे कार्यक्रम झाले त्यातील बरीचशी प्रेरणाजनक उद्बोधने पूज्य गुरुजींच्या प्रवचनांमधून घेऊन दाखविण्यात व ऐकविण्यात आली. यांचे विवरण (संग्रह) आम्ही विपश्यनेच्या पुढील अंकात छाया-चित्रांसहित प्रकाशित करणार आहोत. सद्य-स्थितीत खालील काही चित्रांमध्ये पगोड्याच्या वरील भागातील परिक्रमा-पथावर म्हणजे कैनोपीवर 4 फेब्रुवारीच्या पूर्व-संध्येला 6 ते 7 ची सामूहिक साधना करताना देश-विदेशातील साधक-साधिका आणि भिक्षुगण दिसत आहेत:-

oooooooooooooooooooooo







## 'धम्म सम्बोधि' नवे दीर्घ शिबिर विपश्यना केंद्र

बोधगयामध्ये दीर्घशिबिरांकरीता एका नवीन विपश्यना केंद्राची योजना बनविण्यात आली आहे. याच्या अनुसार धम्मबोधि विपश्यना केंद्राच्या बाजूला 8 एकर भूमीवर या केंद्राचे निर्माण कार्य आरंभ होत आहे ज्याचा मास्टर प्लान तयार झाला आहे. या केंद्रात 100 साधकांसाठी दीर्घ-शिबिरांची सुविधा उपलब्ध होईल.

'धम्म सम्बोधि' मध्ये 104 साधक निवास, 120 शून्यगारांसहित पगोडा तसेच ध्यान कक्ष, पुरुष आणि महिला आचार्य निवास, भोजन कक्ष, कार्यालय, स्टोअर इत्यादींचे निर्माणकार्य केले जाईल. या परियोजनेत जवळपास 20 करोड़ रुपयांची रक्कम अंदाजित आहे.

या महान धर्मकार्यात सहभागी होण्याचा पुण्य-अवसर उपलब्ध आहे. साधक-साधिका खालील ईमेल आणि फोनवर प्रत्यक्ष संपर्क करु शकतात.

मंगल कामनांसहित,

'धम्म बोधि', बोधगया अंतर्राष्ट्रीय विपश्यना ध्यान केंद्र, बोधगया, बिहार, भारत.

वेबसाइट: bodhi.vridhamma.org

ईमेल: accounts. bodhi@vridhamma.org

फोन: +91-9930796064

### दोहे धर्माचे

निबीड अरण्यी भटकता, विकलच, चुकलो वाट।
सहज दाखवी धर्म-पथ, गुरुवर पकडे हात॥

धन्य भाग्य गुरु च मिळे, करुणेचे भांडार।
आंधळ्यास दृष्टी मिळे, सत्य धर्माचे सार॥

धर्म नीर च असे मिळे, धुतला मनाचा वेश।
लोपला बघता बघता, तन-मनाचा च क्लेश॥

मन मद मत्त च हत्तीसम, मुळीच ना होय वश।
संत माहुतासम मिळे, ठेवे त्यावर अंकुश॥

### दोहे धर्माचे

धन्य भाग्य गुरु भेटे, असाच संत सुजाण।
शुद्ध धर्म च असा दिला, करण्या परम कल्याण॥

धन्य धन्य बर्मा देशी, संत मिळे अनमोल।
भव दुःख व्याकुळ जीवास, दिला च अमृत-घोळ॥

मृगजळी रे भटकता, विकलच, चुकलो वाट।
गुरु सरोवरासम मिळे, अमृत भरले दाट॥

मनुष्य जन्म च रत्नासम, झाला असता बर्बाद।
जरी का गुरु ना चाखवी, धर्म सुधारस स्वाद॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2567, माघ पौर्णिमा, 24 फेब्रुवारी, 2024 वर्ष 7 अंक 12

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/RNP 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 16 FEBRUARY, 2024, DATE OF PUBLICATION: 24 FEBRUARY, 2024**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076,
244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org